"आधार" नोंदणी केन्द्राच्या पर्यवेक्षकाला पडताळणी कर्ता म्हणुन घोषित करणेबाबत

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन क्रमांक मातंसं 0311/प्र.क्र.3/39,
दिनांक ५ मार्च 2011

वाचा 1) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र.मातंसं 2010/प्र.क्र.71/39, दि. 9.9.2010
2) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र.2010/प्र.क्र.48/39, दि. 28.1.2011
3) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र.मातंसं 2010/प्र.क्र.109/39, दि. 24.2.2011

**प्रस्तावना:-**

रहिवाशांना विशिष्ट ओळख क्रमांक (Unique Identity Number) देण्यासाठी "आधार" या प्रकल्पाची अंमलबजावणी राज्यात सुरु झालेली आहे. ओळख क्रमांकासाठी रहिवाशांची ओळख पटवणे आणि त्यानुषंगाने सादर करावयाच्या कागदपत्रांची पडताळणी करण्यासाठी शासकीय कर्मचा-यांची पडताळणीकर्ता म्हणुन नियुक्ती करण्याचा निर्णय क्र. 1 वरील दिनांक 9..9.2010 च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आलेला आहे. तथापि सदर कर्मचारी संपूर्ण नोंदणी प्रक्रीये दरम्यान नोंदणी केंद्रावर उपस्थित राहु शकत नाहीत. परिणाम स्वरुप नोंदणीचे काम अपेक्षित गतीने होत नसल्याचे निदर्शनाला आलेले आहे. आधार क्रमांक नोंदविण्याचे काम अपेक्षित गतीने होण्यासाठी आवश्यक ती उपाययोजना करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

नोंदणीसाठी सादर करावयाच्या कागदपत्रांची पडताळणी करण्याची जबाबदारी आता नोंदणी केंद्राच्या पर्यवेक्षकाकडे सोपविण्याचा निर्णय शासनानी घेतला आहे. यासाठी खालील मार्गदर्शक सूचना देण्यात येत आहेत:-

1) नोंदणीसाठी आलेल्या रहिवाशाने तक्त्यात भरुन दिलेली माहिती तसेच शासनाने विहित केलेली कागदपत्रांची पडताळणी नोंदणी केंद्राचे पर्यवेक्षक करतील.
2) नोंदणीसाठी सादर केलेल्या अर्जावर पडताळणीकर्ता म्हणुन नियुक्त केलेल्या पर्यवेक्षकाने पडताळणी केली असे नमुद करुन आपल्या नांवासह स्वाक्षरी करावी. तसेच नोंदणी कर्त्या संस्थेचे नाव नमुद करावे.
3) नोंदणी केंद्राच्या पर्यवेक्षकाने नोंदणी केलेल्या रहिवाशांची नांवे आणि नोंदणी करताना तपासलेली कागदपत्रे यांच्यासाठी नोंदवही ठेवावी.
4) नोंदणीकर्त्या संस्थानी आपल्या नोंदणी केंद्रावरील पर्यवेक्षकांची यादी त्यांच्या आधार ओळखपत्रांसह संचालक (मातं) यांच्याकडे छाननीसाठी पाठवावी.
5) रहिवाशांच्या नोंदणीसाठी करावयाच्या पडताळणीच्या कामातील उणिव किंवा चुकांची जबाबदारी नोंदणीकर्त्या संस्थेची राहिल.

नोंदणीकर्त्या संस्था आणि पडताळणीकर्ता म्हणुन नियुक्त केलेल्या पर्यवेक्षकांनी वरील मार्गदर्शक सूचनांचे पालन करावे.

हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध असून त्याचा संकेतांक क्रमांक २०११०३०५१९८३९३६००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

( डॉ.नितीन करीर )
सचिव (मातं)

प्रत,
मुख्य सचिव / अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव/सचिव
सर्व जिल्हाधिकारी / सर्व महानगरपालिका आयुक्त
सर्व नोंदणी करणाऱ्या संस्था
निवड नस्ती कार्या-३९

युनिक आयडेन्टिटी प्राधिकरणामार्फत राबविल्या
जाणाऱ्या प्रकल्पावर संनियंत्रण ठेवणेबाबत...

महाराष्ट्र शासन
शासन निर्णय क्रमांक:मातंसं/नस्ती२०१०/प्र.क्र.४८/३९,
सामान्य प्रशासन विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक: ३ एप्रिल, २०१०

**शासन निर्णय:-**

केंद्र सरकारने नियोजन आयोगाच्या अधिपत्याखाली युनिक आयडेन्टिटी ऑथॉरिटी या प्राधिकरणाची स्थापना केली आहे. भारतीय नागरिकांना ओळख क्रमांक देण्यासाठी आवश्यक त्या तांत्रिक व विधि विषयक पायाभूत सोयी सुविधा निर्माण करणे व त्यांची अंमलबजावणी करणे ही या प्राधिकरणाची जबाबदारी आहे. प्राधिकरणामार्फत राबविल्या जाणाऱ्या प्रकल्पाची राज्यात प्रभावी अंमलबजावणी व्हावी म्हणुन या प्रकल्पावर देखरेख व संनियंत्रण करण्यासाठी खालील समिती गठीत करण्यास मा.मुख्यमंत्र्यांनी मान्यता दिली आहे.

| | | |
|---|---|---|
| १. मुख्य सचिव, | -- | अध्यक्ष |
| २. अपर मुख्य सचिव, सा.आ. व कुटुंबकल्याण | - | सदस्य |
| ३. प्रधान सचिव, शालेय शिक्षण | - | सदस्य |
| ४. प्रधान सचिव, नियोजन | -- | सदस्य |
| ५. सचिव, ग्रामविकास व पंचायत राज | -- | सदस्य |
| ६. सचिव, अ.ना.पु.ग्रा.सं. | -- | सदस्य |
| ७. जनगणना आयुक्तांचे प्रतिनिधी, नवी दिल्ली | -- | सदस्य |
| ८. युनिक आयडेन्टिटी प्राधिकरणचे प्रतिनिधी, नवी दिल्ली | -- | सदस्य |
| ९. सचिव (न.वि. २) | -- | सदस्य |
| १०. सचिव, सहकार व वस्त्रोद्योग | -- | सदस्य |
| ११. प्रधान सचिव (मा.तं.) | -- | सदस्य सचिव |

सदरचा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्यांचा संगणक संकेतांक २०१००४०३१७२६३१००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

(डॉ. अजय भूषण पांडेय)
प्रधान सचिव (मातं)

प्रत,
१, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
२. मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
३. अ.मु.स.सार्वजनिक आरोग्य, मंत्रालय, मुंबई
४. प्रधान सचिव, शालेय शिक्षण, मंत्रालय, मुंबई
५. प्रधान सचिव, नियोजन, मंत्रालय, मुंबई
६. सचिव ,ग्राम विकास,मंत्रालय, मुंबई
७. सचिव, अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
८. सचिव (न.वि. २). नगर विकास, मंत्रालय,मुंबई
९. सचिव, सहकार व वस्त्रोद्योग,मंत्रालय,मुंबई

ग्रामीण भागात पुरविण्यात येणा-या वित्तीय सुविधा अनुदान इत्यादी महा-ई-सेवा केंद्र मार्फत अदा करणे बाबत.

महाराष्ट्र शासन

सामान्य प्रशासन विभाग (मातं)

मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२

शासन निर्णय क्रमांक :मातंसं २०११/प्र.क्र.२९५/३९

दिनांक-13 ऑक्टोबर, २०११

**प्रस्तावना :-**

राज्यातील नागरिकांना शासनाकडून पुरविण्यात येणा-या विविध नागरी सुविधा, व्यवसायिकां कडून नागरिकांना पुरविण्यात येणा-या वित्तीय सुविधा, महा-ई-सेवा केंद्रा मार्फत देण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. त्या अनुषंगाने राष्ट्रीय ई प्रशासन योजने (National e-Governance Plan) अंतर्गत राज्यात एकूण ११,८२२ महा-ई-सेवा केंद्र स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे.

केंद्र व राज्य शासना कडून नागरिकांना देण्यात येणारे वित्तीय सहाय्य, अनुदान ई लाभार्थ्यांना महा-ई- सेवा केंद्रा मार्फत अदा करणे आणि त्यामाध्यमातुन केंद्र चालकांना उत्पन्नाचे साधन उपलब्ध होईल या दृष्टीकोनातुन केंद्र शासनाच्या माहिती तंत्रज्ञान विभागाने व्यवसायिक प्रतिनिधी प्रतिमानाचा (Business Correspondent model) तयार केलेले आहे. या प्रतिमानाचा अंमलबजावणीसाठी महा-ई- सेवा केंद्र चालकाला अनुदान अदा करण्यासाठी बँकांचा व्यवसायिक प्रतिनिधी म्हणून (Business Correspondent) प्रतिनिधी नियुक्त करण्यात यावे. अशा सूचना केंद्र शासनाच्या माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाच्या दि. २ सप्टेंबर,२०११ च्या पत्रान्वये करण्यात आलेल्या आहेत.

**शासन निर्णय :-**

केंद्र शासनाच्या वरील सूचना विचारात घेवून राज्य शासनाने शासनाकडून देण्यात येणारे अनुदान, वित्तीय सहाय्य अदा करण्यासाठी व्यवसायिक प्रतिनिधी प्रतिमानाचा (Business Correspondent model) वापर करण्याचा निर्णय राज्यशासनाने घेतला आहे . प्रमिमान खालील प्रमाणे राबविण्यात येईल. :-

(१) केंद्र शासनाच्या सूचनेनुसार राज्यातील नागरिकांना राज्य / केंद्र शासना मार्फत पुरविण्यात येणारी अनुदाने महा-ई-सेवा केंद्रा मार्फत अदा करण्यात येतील. अशा प्रकारे अनुदान अदा करण्यासाठी महा-ई-सेवा केंद्राना Mirco ATM खरेदी करावे लागेल या ATM द्वारे होणारा व्यवहार " आधार" क्रमांकाशी संलग्न करण्यात येईल. जेणेकरून सुयोग्य लाभार्थ्यांनांच योजनांचा फायदा होईल.

(२) केंद्र शासनाने सुचविलेले व्यवसाय प्रतिनिधी प्रतिमान (Business Correspondent model) राबविण्यासाठी महाराष्ट्र राज्यात विविध बँकाकडून महा -ई-सेवा केंद्र चालविणा-या

संस्थांची नोंदणी करण्यात येईल.

(३) महा-ई-सेवा केंद्र चालकांना Micro ATM मशीन खरेदी करण्यासाठी खालील प्रमाणे वित्तीय सहाय्य (Subsidy) राज्यशासनाकडून देण्यात येईल.

(४) ही योजना राबविण्यासाठी राज्य शासनाने निश्चित केलेले टप्पे व त्यासाठीचे अनुदान यांचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| टप्पा | त्या अतंर्गत येणारे सामायिक सुविधा केंद्र | मशिनची किंमत | शासना कडून देण्यात येणारे वित्तीय सहाय्याचे प्रमाण | प्रत्येक केंद्राला देण्यात येणारे वित्तीय सहाय्य रूपये | केंद्र चालनकाने भरावयाची रक्कम रूपये |
|---|---|---|---|---|---|
| १ | १५% | रूपये ८५००/- | ७५% | ६३७५ | २१२५ |
| २ | २५% | | ५०% | ४२५० | ४२५० |
| ३ | ५०% | | २५% | २१२५ | ६३७५ |
| ४ | १०% | | १०% | ८५० | ७६५० |

ही योजना राबविण्यासाठी येणारा खर्च राज्य सेतु सोसायटीला आधार योजना राबविण्यासाठी मिळणा-या निधीतुन भागविण्यात येईल.

सदर शासन निर्णयाची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आलेली असून त्याचा संगणक संकेतांक असा आहे. 201110131801220001

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

(राजेश अगरवाल)
शासनाचे सह सचिव, (माहिती तंत्रज्ञान)

प्रत
सचिव/प्रधान सचिव/अपर मुख्य सचिव सर्व मंत्रालयीन विभाग
सर्व विभागीय आयुक्त.
सर्व जिल्हाधिकारी
सर्व आयुक्त, महानगरपालिका.
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी